# जिल्हा परिषद अमरावती

मुख्य़ कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१

दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in

वेबसाईट - www.zpamravati.gov.in


क्रमांक जिप/मुकाअ/49/स्वीस/2017

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

दिनांक - 3 मे, 2017

## परिपत्रक

मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक 6076/2016 दिनांक 5.12.2016 मधील निर्णयाच्या अनुषंगाने 2.5.2017 ला जून 2016 मध्ये झालेल्या बदल्यांमधील वादी यांनी समुपदेशनाने स्विकारलेल्या पदस्थापनेच्या जागी रुजू होण्याचे निर्देश आहेत. या निर्देशाप्रमाणे दिनांक 3.10.2017 रोजी जिल्हा परिषद अमरावतीने निर्गमित केलेल्या बदल्यांच्या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे आदेश दिनांक 25.4.2017 रोजी निर्गमित झाले आहेत. सदर आदेशाप्रमाणे जून 2016 च्या प्रशासकीय बदली मधील सपाटीवरील 252 शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी/निलंबन/बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांचे कालावधीतील प्रदाने) नियम 1981 चे नियम 15 नुसार पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यास सात दिवसांचा कालावधी उपलब्ध असुन तो कालावधी संपताच म्हणजेच 2 मे, 2017 रोजी सदर शिक्षकांना बदलीचे ठिकाणी रुजू होणे आवश्यक होते. परतु विविध कारणांमुळे सदर 252 शिक्षकांना रुजू होता आले नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झाल्यामुळे पुढील प्रमाणे तांत्रिक अडचणी उपस्थितीत होतात ः

(1) सदर 252 शिक्षकांना दिनांक 25.4.2017 रोजी कार्यमुक्त केल्यानंतर त्या तारखेनंतरचे वेतन त्याठिकाणी काढता येत नाही.

(2) रुजू कालावधी संपल्यानंतर बदलीने पदस्थापना झालेल्या पंचायत समितीमध्ये ते ज्याठिकाणी रजू होतील त्या ठिकाणी त्यांचे वेतन 7 दिवसांच्या रुजू कालावधीचे व रुजू झाल्यानंतरचे वेतन काढावे लागेल.

(3) रुजू होण्यास सात दिवसापेक्षा जास्त कालावधी लागणा-या कर्मचा-यांच्या संबंधिताच्या सेवेत खंड  दिसेल व त्यांचे कारण वाजवी असल्यास सेवापुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे.

(4) दिनांक 25.4.2017 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यमुक्त केले असल्यामुळे सेवेतील खंड असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून क्षमापीत करावा लागेल.

वरील प्रमाणे  संबंधिताच्या सेवाविषयक बाबीवर गंभीर परिणाम होऊन त्यांना भविष्यात अडचणी होवू नये म्हणून पुढील प्रमाणे कार्यवाही आखून देण्यात येत आहे.

1. संबंधित कर्मचा-यांनी वाजवी व योग्य कारणे नमुद करुन तांत्रिकदृष्टया सेवाखंड असणा-या शिक्षकांनी त्यासाठी विनंती अर्ज/रजा अर्ज संबंधित मुख्याध्यापकामार्फत गट शिक्षणाधिकारी यांचेकडे नविन ठिकाणी रुजू झाल्यानंतर सादर करावा.
2. गट शिक्षणाधिकारी यांनी असे सर्व अर्ज शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचे शिफारसीसह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रकरण निहाय सादर करावेत.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेपातळीवर प्रकरणनिहाय कार्यवाही होवून योग्य ते आदेश निर्गमित करण्यात येतील याची नोंद घ्यावी.
4. सदर प्रकरणात खंड क्षमापीत करण्यासाठी रुजू कालावधी व्यतिरिक्तच्या कालावधी मंजुर करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे व्यतिरिक्त इतर अधिका-यांनी वापरु नये.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रत -

1. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि.प. अमरावती.
2. गट विकास अधिकारी , पंचायत समिती ~~चिखलदरा~~. सर्व,
3. गट शिक्षणाधिकारी, पचांयत समिती ~~चिखलदरा~~, सर्व
4. ~~संबंधित अर्जदार~~..